# जग रीत

हसतमुख असाल तर हसेल जगही तुम्हासोबत
रडक्या चेहऱ्याला कुणीच नाही देत साथ
कारण थकलेली पृथ्वी घेते आनंद उसनवार
अनंत अडचणींनी तिलाच टाकलेय पेचात

तुम्ही गाणे गायलात तर शिखरे साद देतील
उसासे सोडलेत तर हवेतच जातील विरून
प्रतिध्वनींचे आनंदरवाशीच धागे जुळतात
निराश दुःखी स्वरांकडे पाहतात ते दुरून

जल्लोष केलात तर लोक धुंडाळत येतील
शोकाकुल झालात तर जातील तोंड फिरवून
तुमच्या सर्व सुखांत त्यांना वाटा हवा असतो
कटकटींकडे तुमच्या मात्र पाहणार नाहीत ढुंकून

प्रसन्न रहाल तर खूप मित्र होतील
विमनस्क असाल तर सोडून जातील साथ
तुमचे मधुर अमृत कोण कशाला नाकारेल!
दुःखाचे कढ मात्र गिळावे लागतील आतल्या आत

पक्वान्ने वाढाल तर पाहुण्यांची  गर्दी होईल
निघून जातील सारेच, जर उपोषणाची धराल वाट
आयुष्य सोपे होते जर कीर्ती धन वाटले लोकांत
मृत्यूसमयी मात्र नाही देऊ शकत कुणी साथ

सुखाच्या महालांतून प्रशस्त जागा असते
जाऊ शकते शाही मिरवणुक जिथून
पण वेळ आली की एकामागे एक
जावे लागेल वेदनांच्या अरूंद बोळांतून

Solitude / Way of the World by Ella Wheeler Wilcox
Translation by Abhay B. Joshi and Milind A. Toro